| | | |
|---|---|---|
| MHGA110000392022 | दाखल दिनांक | ०३.०२.२०२२ |
| | नोंदणी दिनांक | ०३.०२.२०२२ |
| | निकाल दिनांक | २१.०४.२०२६ |
| | कालावधी | ०४ वर्ष,०२ म. १८ दि. |

## न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी कुरखेडा यांचे न्यायालय

(पीठासीन अधिकारी– एन. पी. देशपांडे )

**म.सं.कौ.हिं.का. अर्ज क्र. ०२/२०२२** **नि.क्र.६२**

**१) सौ. गायत्री नानेश्वर गहाणे,**
वय:– ३२ वर्ष, व्यवसाय – घरकाम,
ह.मु. कुरखेडा, तालुका– कुरखेडा,
जिल्हा– गडचिरोली. .. **अर्जदार**

**विरुध्द**

**१) नानेश्वर विठ्ठल गहाणे,**
वय:– ३६ वर्ष, धंदा – शेती/व्यवसाय,
**२) विठ्ठल ईस्तारी गहाणे,**
वय:– ६० वर्ष, धंदा – शेती/व्यवसाय,
**३) विमल विठ्ठल गहाणे,**
वय:– ५५ वर्ष, धंदा – शेती/व्यवसाय,
गैरअर्जदार क्र. १ ते ३ रा. खोबा/कोकणा,
तालुका–सडक/अर्जुनी, जिल्हा– गोंदीया.
**४) सुभाष हरीशचंद्र कापगते,**
वय:– ५० वर्ष, धंदा – नौकरी/शिक्षक,
रा. रेंगेपार/कोहळी, तालुका–लाखनी,
जिल्हा– भंडारा. .. **गैरअर्जदार**

**कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम १२ नुसार**

---

अर्जदारातर्फे विद्वान अधिवक्ता – श्री. पी.एन. बुध्दे आणि जि.एम. नागमोती
गैरअर्जदार क्र. १ ते ४ तर्फे विद्वान अधिवक्ता –श्री. ए.पी. नाकाडे आणि
टी. डी. कापगते

---

**न्यायनिर्णय**

(दि. २१ एप्रिल, २०२६ रोजी घोषित)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम १२ प्रमाणे दाखल केलेला आहे.

**अर्जदार हिचे कथन थोडक्यात खालील प्रमाणे –**

२. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदाराचा पति असुन गैरअर्जदार क्र. २ व ३ हे सासरे सासु आणि गैरअर्जदार क्र. ४ हा गैरअर्जदार क्र. १ च्या मावशीचा नवरा आहे. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचे लग्न दिनांक १२.०६.२०२० रोजी खोबाकोपना, जिल्हा गोंदीया येथे गैरअर्जदारांचे घरी झाले. गैरअर्जदार क्र. ४ हा शिक्षक म्हणुन नोकरीवर आहे व तो कोरोना महामारी दरम्यान गैरअर्जदार क्र. १ ते ३ च्या घरी येवुन मुक्कामाला राहत असे. अर्ज कथनाप्रमाणे गैरअर्जदारांनी सुरवातीचे पंधरा दिवस तिला व्यवस्थीत नांदविले. त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांनी तिला शारीरीक व मानसिक त्रास देणे सुरू केले. गैरअर्जदार तिला तिचे वडीलांकडुन २ लाख रूपयांची मागणी करीत होते. परंतु, ते देण्याची तिची ऐपत नव्हती. त्यामुळे ते तिला चांगली वागणुक देत नव्हते, तिच्या खाण्यापिण्याकडे दुर्लक्ष करीत होते व तिची प्रकृती बिघडली असता डॉक्टरकडे नेत नव्हते. गैरअर्जदारांनी हुंडयाच्या मागणीवरून अर्जदाराला अनेकदा असहाय मारझोड केली, गैरअर्जदार क्र. ४ हा त्यासाठी प्रोत्साहन देत होता व गैरअर्जदार क्र. १ ते ३ तिला पैसे आणले नाही तर जंगलात नेवुन खतम करून् टाकु अशी धमकी देत होते.

३. दरम्यानचे काळात अर्जदार ही गरोदर असल्याची माहिती गैरअर्जदार क्र.

१ ते ३ यांना अर्जदाराने दिली असता त्यांनी अर्जदाराचा दवाखान्यात औषधोपचार न करता सदरचे मुल गैरअर्जदार क्र. १ चे नाही, तिचा गर्भपात करून घे असे म्हणुन तिच्या चारीत्र्यावर संशय घेणे सुरू केले. गैरअर्जदार क्र. १ ने तिला लाथाबुक्याने मारहाण केली, तिने गर्भपाताच्या गोळया खाल्या नाहीतर मारून टाकण्याची धमकी देवुन तिला घरातुन वारंवार ओढत नेवुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला. अर्जदाराने तिचे वडीलांकडुन ५० हजार रूपये गैरअर्जदारांना दिले असता ते पुन्हा दिड लाख रूपयाची मागणी करू लागले व तिला त्यांनी घराबाहेर काढले.

४. अर्जदाराने दिनांक १०.०१.२०२१ रोजी गैरअर्जदार क्र. १ ते ४ विरूध्द पोलीस ठाणे दुग्गीपार येथे तक्रार दिली परंतु त्यांनी त्याची दखल घेतली नाही म्हणुन अर्जदाराने पुन्हा दिनांक २३.०१.२०२१ रोजी पोलीस ठाणे कुरखेडा येथे त्यांचे विरूध्द भारतीय दंड विधानाचे कलम ४९८–अ, ३१५ हुंडाबंदी अधिनियमाचे कलम ईत्यादी कलमानुसार गुन्हा दाखल केला व त्यानुसार सद्या सत्र खटला मा. सत्र न्यायालय गडचिरोली येथे प्रलंबित आहे. दिनांक २६.०४.२०२१ रोजी अर्जदाराने एका मुलीला जन्म दिला व दवाखान्यातुन सुट्टी झाल्यावर ती मुलीला घेवुन खोबा कोपना येथे गेली असता गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी तिच्या मुलीला घरात घेण्यास मज्ञाव केला, त्यामुळे अर्जदाराने दिनांक ०१.०५.२०२१ रोजी पोलीस ठाणे दुग्गीपार येथे जावुन फिर्याद दिली, त्यानंतर पोलीसांनी अर्जदार व गैरअर्जदारांना समजाविले असता गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी अर्जदारांकडुन मुलगी हिरावुन घेवुन त्यांचेकडे ठेवली व तिला माहेरी गेली नाही तर मुलीला मारून टाकण्याची धमकी दिली. दिनांक ०२.०५.२०२१ रोजी अर्जदाराची मुलगी गैरअर्जदाराकडे मयत झाली व तिचे मृत्युस गैरअर्जदार क्र. १ ते ३ हे कारणीभुत आहेत. अर्जदाराचे पालनपोषणाची गैरअर्जदार क्र. १ ने कसलीही व्यवस्था केली नाही. त्याचेकडे दहा एकर शेती असुन त्यामध्ये ऊस व ईतर नगदी पिके घेतली जातात व त्यापासुन त्याला दरवर्षी एक लाख रूपयाचे उत्पन्न मिळते. त्यामुळे तो अर्जदाराला कलम २० प्रमाणे नुकसान भरपाई रक्कम रूपये पाच लाख, दरमहा पोटगी दहा हजार, वैद्यकीय खर्च पन्नास हजार व कलम १८ प्रमाणे संरक्षण आदेश मिळणेची विनंती केली आहे.

५. गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांनी नि.क्र.२२ खाली त्यांचे म्हणणे दाखल करून अर्जदाराशी त्याचा नातेसंबंध मान्य केला आहे. त्यांनी खालील बाबींवरून अर्जास विरोध केला आहे. गैरअर्जदाराचे म्हणण्याप्रमाणे अर्जदार ही पुर्वी विधवा होती व तिचे दुसरे लग्न गैरअर्जदार क्र. १ बरोबर झाले. गैरअर्जदार अपंग असल्यामुळे व त्याची आर्थिक परीस्थती चांगली नसल्यामुळे लोक मुली देत नव्हते. गैरअर्जदारांचे व अर्जदाराचे संमतीने त्यांचे लग्न पार पाडले. परंतु, अर्जदार ही लग्नानंतर तिचे मयत झालेल्या पतीच्या कुटुंबाचा विचार करत होती. दरम्यानचे काळात अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ पासुन गरोदर राहिली व ते दोघे कुरखेडा येथे गणपती उत्सवासाठी जावुन गैरअर्जदार क्र. १ परत आला. परंतु, अर्जदार ही परत आली नाही. सन २०२० चे दिवाळी सणामध्ये गैरअर्जदाराने अर्जदाराला त्याचे घरी नेले. परंतु, अर्जदाराचे वडीलांना कोरोनाची बाधा झाल्याने अर्जदार पुन्हा २५.११.२०२० रोजी कुरखेडा येथे गेली, दरम्यानचे काळात अर्जदाराचे वडीलांचे ०४.१२.२०२० रोजी निधन झाले. त्यानंतर दिनांक २९.१२.२०२० रोजी अर्जदाराचे नातेवाईकांनी गैरअर्जदाराचे घरी बैठक बसविली, त्यांनी अर्जदाराला नांदवायचे नाही, मुल नको, गर्भपातास संमती दया व अर्जदाराला सोडचिठ्ठी दया असे म्हणुन दबाव टाकला. गैरअर्जदार क्र. १ ने त्यास नकार दिला असता अर्जदार त्यांचे सोबत तिचे माहेरी निघुन गेली. गैरअर्जदाराने त्यानंतर अर्जदाराला फोन करून बोलाविण्याचा प्रयत्न केला असता ती त्याचे सोबत बोलली नाही. दिनांक २६.०४.२०२१ रोजी अर्जदाराने गैरअर्जदाराचे मुलीला ब्रम्हपुरी येथे जन्म दिला व अवघ्या चार दिवसाने तिची बहिण प्रतिभा गायकवाड हिचे सोबत गैरअर्जदाराचे घरी चार दिवसाचे लहान मुलीला सांभाळा असे म्हणुन टाकुन कुरखेडा येथे निघुन गेली. त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदाराविरूध्द पोलीस ठाणे दुग्गीपार येथे तक्रार दिली, त्यांची मुलगी लहान असल्याने तिला डॉ. चेतन पुस्तोडे यांचेकडे व सडक अर्जुनी येथील सरकारी दवाखान्यात उपचारासाठी नेले परंतु अर्जदार ही मुलीला नेण्यास तयार नसल्यामुळे दिनांक ०२.०५.२०२१ रोजी उपचारा दरमयान मुलीचा मृत्यू झाला.

६. गैरअर्जदार क्र. १ हा अपंग असल्यामुळे अर्जदाराची त्याचेसोबत

नांदण्याची ईच्छा नाही. दिनांक ०९.०९.२०२१ रोजी गैरअर्जदाराने वकीलामार्फत हिंदु विवाह अधिनियमाचे कलम ९ प्रमाणे अर्जदाराला नोटीस पाठविली, त्यासंबंधीचा अर्ज न्यायालयात दाखल केला व तो सद्या प्रलंबित आहे. गैरअर्जदार क्र. १ हा अपंग असल्यामुळे कोणतेही काम करू शकत नाही, अर्जदार ही महिन्याकाठी खाजगी नोकरी करून १५ हजार रूपये कमाविते. गैरअर्जदार क्र.४ हा अर्जदार क्र. १ च्या मावशीचा नवरा असुन तो गैरअर्जदाराचे घरी कोरोना परीस्थीतीमुळे गेला नाही. त्याचा व गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांचा जिल्हा वेगळा असुन गैरअर्जदार क्र. ४ ला विनाकारण त्रास देण्यासाठी अर्जदाराने त्याचे विरूध्द अर्ज दाखल केला आहे. सबब, गैरअर्जदारांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

७. **उभय पक्षाला मान्य असलेल्या बाबी** :- नातेसंबंध अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ हे पती व पत्नी, ईतर गैरअर्जदार हे गैरअर्जदार क्र. १ चे नातेवाईक आहेत ते उभय पक्षाला मान्य आहे. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ चे लग्न दिनांक १२.०६.२०२० रोजी झाले.

८. अर्जदाराचे कथन लक्षात घेता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ येतात व त्यावरील निष्कर्ष पुढील प्रमाणे देत आहे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांनी अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार केला आहे असे अर्जदार सिध्द करते काय ? | होकारार्थी |
| २ | अर्जदार ही विनंती प्रमाणे अनुतोष मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशत: होकारार्थी |
| ३ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

९. अर्जदार गायत्री नानेश्वर गहाने हिने स्व:ला नि.क्र.२५ वर तपासले आहे.

तिने गुन्हा क्र. १९/२०२१ चा छापिल खबरी अहवाल नि.क्र. ४४ वर, गट क्र. ५१ मौजा खोबा याचा ७/१२ उतारा नि.क्र. ४५, गट क्र. ५०/१ चा दिनांक ०६.११.२०२२ मौजा खोबा चा ७/१२ नि.क्र. ४६, गट क्र. २५ दिनांक १३.०२.२०२३ मौजा खोबा कोपना चा ७/१२ उतारा नि.क्र ४७ व गाव नमुना नंबर ०८–अ नि.क्र ४८ ची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे.

१०. गैरअर्जदार क्र. १ नानेश्वर विठ्ठल गहाने याने त्याला नि.क्र.५३ वर तपासले असुन त्याने नि.क्र. ५४ वर तो शारीरीक दृष्टया असक्षम असल्याची छायांकित प्रमाणपत्राची प्रत दाखल केली आहे. गैरअर्जदाराने नि.क्र. ५७ वर हिंदु विवाह याचिका क्र. १५१/२०२२ दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर गोंदीया यांचा कलम ९ चा न्यायनिर्णय दिनांक १२.०९.२०२५ नि.क्र. ५८ वर व त्यातील हुकुमनामा नि.क्र. ५९ वर दाखल केला आहे.

११. अर्जदारांतर्फे विद्वान विधिज्ञ जि.एम. नागमोती व गैरअर्जदारांतर्फे विद्वान विधीज्ञ ए.पी. नाकाडे व टी. डी. कापगते यांचा युक्तिवाद ऐकला. गैरअर्जदारांतर्फे विद्वान विधीज्ञ यांनी **जयेश उत्तमराव खैरनार व अन्य विरूध्द महाराष्ट्र सरकार व ईतर मधील मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचा २०१० ऑल एम आर कीमिनल २२५९** मधील न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे.

**मुद्दा क्र. १ करिता**

१२. अर्जदार गायत्री नानेश्वर गहाने हिचे नि.क्र. २५ वरील तोंडी पुराव्याप्रमाणे लग्नानंतर गैरअर्जदारांनी तिला सुरवातीचे पंधरा दिवस चांगले नांदविले व त्यानंतर ते तिला आईवडीलांकडुन दोन लाख रूपयाची मागणी करू लागले, त्यामुळे ते तिला चांगली वागणुक देत नव्हते, तिच्या खाण्यापिण्याकडे दुर्लक्ष करीत होते व तिला औषधोपचारासाठी दवाखान्यात नेत नव्हते. अर्जदाराचे तोंडी पुराव्याप्रमाणे गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी तिला हुंडयाच्या मागणीसाठी मारझोड केली व गैरअर्जदार क्र. ४ त्यांना प्रोत्साहन देत होता. गैरअर्जदार क्र. १ ते ३ हे तिला जिवे मारण्याची धमकी देत होते. गैरअर्जदारातर्फे घेतलेल्या उलटतपासात अर्जदाराने गैरअर्जदार क्र. १ सोबत

तिचे दुसरे लग्न झाले होते, पहिल्या लग्नापासुन तिला बारा व वर्षाची मुलगी आहे, गैरअर्जदार हा अपंग असल्याचे तिला माहीती होते असे तिने मान्य केले आहे.

१३. अर्जदाराचे तोंडी पुराव्याप्रमाणे ती गरोदर राहिल्यानंतर मुल दुस–याचे आहे, गर्भपात करून घे असे म्हणुन तिचे चारीत्र्यावर संशय घेवुन तिला शिवीगाळ व मारझोड करीत होते. अर्जदाराचे तोंडी पुराव्याप्रमाणे गैरअर्जदार क्र. १ याने तिच्या पोटावर रात्रीच्या वेळी लाथाबुक्याने मारहाण केली व तिला गर्भपाताच्या गोळया खाल्या नाही तर मारून टाकण्याची धमकी दिली. अर्जदाराचे पुढील तोंडी पुराव्याप्रमाणे त्यानंतर तिचे आईवडीलांनी गैरअर्जदार क्र. १ ला पन्नास हजार रूपये दिले व गैरअर्जदाराने तिला तीन महिने चांगले नांदविले, पुन्हा २५.११.२०२० रोजी दिड लाख रूपयांची मागणी केली व तिला लाथाबुक्या मारून घराबाहेर काढले. गैरअर्जदारातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात अर्जदाराने गरोदर राहिल्यानंतर तिने नवेगांव तालुका अर्जुनी येथील डॉ. कापगते यांचेकडे उपचार घेतले, गैरअर्जदारांकडे कोणतेही लहान मुल नव्हते व तिचे वडीलांचे अंत्यविधीसाठी तो तिचे माहेरी आला होता असे मान्य केले आहे.

१४. अर्जदाराचे पुढील तोंडी पुराव्याप्रमाणे दिनांक २३.०१.२०२१ रोजी तिने पोलीस ठाणे कुरखेडा येथे गैरअर्जदारांविरूध्द गुन्हा क्र. १९/२०२१ ची नोंद केली व त्यानुसार गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांचे विरूध्द सत्र न्यायालयात खटला न्यायप्रविष्ट आहे. अर्जदाराचे तोंडी पुराव्याप्रमाणे दिनांक ०४.१२.२०२० रोजी तिचे वडीलांचे नागपुर येथे निधन झाले व दिनांक २६.०४.२०२१ रोजी ती बाळंतीन होवुन तिने एका मुलीला जन्म दिला, त्यानंतर ५–६ दिवसाने ती गैरअर्जराचे घरी खोबा येथे गेली असता गैरअर्जदारांनी मुलगी आमची नाही असे म्हणुन त्यांना घरात प्रवेश नाकारला, त्यानंतर तिने ०१.०५.२०२१ रोजी पोलीस ठाणे दुग्गीपार येथे फिर्याद दिली व त्याचवेळी गैरअर्जदार क्र. १ ते ३ हे देखील तेथे आले, तेथे पोलीसांनी त्यांना संमज दिली, त्यावेळी गैरअर्जदाराने पोलीस ठाण्याबाहेर येवुन तिचे मुलीला जबरदस्तीने हिसकावले व तिला धमकी देवुन माहेरी जाण्यास सांगितले. अर्जदाराचे

तोंडी पुराव्याप्रमाणे दिनांक ०२.०५.२०२१ रोजी तिची मुलगी मरण पावती व गैरअर्जदार क्र. १ ते ३ हे त्यास जबाबदार आहेत. अर्जदाराने नि.क्र. ४४ खाली पोलीस ठाणे कुरखेडा यांचा गुन्हा क्र. १९/२०२१ दिनांक २३.०१.२०२१ चा प्रथम खबरी अहवाल कलम ३, ४ हुंडाबंदी अधिनियम, कलम ४९८–अ, ३१५, ५०४, ५०६, ३२३, ३४ भारतीय दंड विधान नि.क्र. ४४ वर दाखल केला आहे.

१५. गैरअर्जदारातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात अर्जदाराने तिचे प्रसुतीचे ४–५ दिवसाने ती नवजात बालाकाला घेवुन गैरअर्जदाराचे घरी गेली होती असे मान्य केले आहे. परंतु, तिने तिचे नवजात बालकाची बालकाचा मृत्यू सडक अर्जुनी येथील सरकारी दवाखान्यात झाला त्यावेळी ती तिचे माहेरी कुरखेडा येथे होती, गैरअर्जदाराने तिला ०९.०९.२०२१ रोजी नोटीस पाठवुन देखील गैरअर्जदाराकडे नांदण्यास गेली नाही, त्यामुळे गैरअर्जदाराने हिंदु विवाह कायदयाचे कलम ९ प्रमाणे गोंदीया येथे अर्ज केला या बाबी मान्य केल्या आहेत. अर्जदाराने नि.क्र. ४४ वर अपराध क्र. १९/२०२१ ची छापिल पहिली खबर दाखल केली आहे.

१६. गैरअर्जदार क्र. १ नानेश्वर विठ्ठल गहाणे याचे नि.क्र. ५३ वरील तोंडी पुराव्यानुसार दिनांक २६.०४.२०२१ रोजी अर्जदाराने ब्रम्हपुरी येथे नवजात मुलीला जन्म दिला व ४ दिवसाने नवजात मुलीला त्यांचे घरी सांभाळा असे म्हणुन कुरखेडा येथे परत गेली, नवजात मुलीला आईच्या दुधाची गरज असतांना आई नसल्यामुळे तिची प्रकृती बरी नसल्याने त्यांने तिला उपचारासाठी चेतन पुस्तोडे व सरकारी दवाखाना सडक अजुुनी येथे नेले व तिचे दिनांक ०२.०५.२०२१ रोजी नवजता मुलीचा मृत्यू झाला, त्याची अपंग म्हणुन लग्न करण्याची ईच्छा नसतांना देखील अर्जदारासोबत त्याचे लग्न झाले आहे. परंतु तिची त्याचेसोबत नांदण्याची ईच्छा नाही. अर्जदारातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात गैरअर्जदार क्र. १ याने तो अर्जदाराला मुल नको असे म्हणुन ती गर्भवती असतांना तिचे पोटावर लाथाबुक्याने मारहाण करीत होता, तिला दवाखान्यात नेत नव्हता असे अमान्य केले आहे. त्याने अर्जदाराने त्याचे विरूध्द मा. सत्र न्यायालय गडचिरोली येथे अर्जदाराने दाखल केलेल्या गुन्हयाच्या

अनुषंगाने सत्र खटला प्रलंबित असल्याचे मान्य करून दिनांक २६.०४.२०२१ रोजी जन्मलेल्या मुलीला अर्जदारापासुन घेतल्यामुळे तिचा दिनांक ०२.०५.२०२१ रोजी मृत्यू झाल्याचे अमान्य केले आहे. गैरअर्जदाराने नि.क्र. ५४ खाली त्याचे अपंगत्व प्रमाणपत्र नि.क्र. ५८ वर हिंदु विवाह याचिका क्र. १५१/२०२२ मधील न्यायनिर्णय दिनांक १२.०९.२०२५ व हुकुमनामा नि.क्र. ५९ दाखल केला आहे.

१७. एकंदर अर्जदाराचे तोंडी पुराव्यानुसार तिने नि.क्र. ४४ खालील गैरअर्जदाराविरूध्दची छापिल पहिली खबर दिनांक २३.०१.२०२१ रोजी पोलीस ठाणे कुरखेडा येथे दिली, त्याचे पुर्वी दिनांक ०४.१२.२०२० रोजी तिचे वडीलांचे नागपुर येथे निधन झाले होते, दिनांक २६.०४.२०२१ तिने गैरअर्जदारांनी तिचे मुल जन्मु नये यासाठी लाथा मारल्याबाबत गुन्हा दाखल केल्यानंतर देखील तिची प्रसुती होवुन तिने एका मुलीला जन्म दिला, जन्म दिल्यानंतर अवघ्या ५-६ दिवसाने ती तिचे नवजात मुलीला घेवुन गैरअर्जदाराचे घरी गेली व तेथे गैरअर्जदाराने त्याला मुल नको असतांना देखील तिचे मुल ठेवुन घेतले असा दिलेला तोंडी पुरावा विश्वसनिय वाटत नाही. तसेच, तिची नवजात मुलगी दिनांक ०२.०५.२०२१ रोजी मरण पावली आहे, ती गैरअर्जदार क्र. १ याला त्यासाठी जबाबदार ठरविते. परंतु, गैरअर्जदाराने तिचे गर्भवती असतांनाचे काळात तिला उपचारासाठी दवाखान्यात नेल्याचे तिने उलटतपासात मान्य केले आहे. अर्जदाराचे तोंडी पुराव्याचे अंती प्रस्तुतचे अर्जापासुन अर्जदार ही माहेरी राहत असल्याने व तिचे गैरअर्जदार क्र. १ सोबत पत्नीचे नाते कायम असतांना गैरअर्जदाराने तिला खावटी दिली नाही व तिचा आर्थिक अडवणुक करण्याचा प्रयत्न केला जो कौटुंबिक हिंसाचारामध्ये समाविष्ट होतो एवढाच पुरावा बाकी राहिला आहे. त्याच बरोबर अर्जदाराने गैरअर्जदार क्र. १ व ईतर गैरअर्जदाराविरूध्द तिचे गर्भावस्थेतील काळात ते तिचे पोटावर लाथा मारीत होते, ते तिला दवाखान्यात नेत नव्हते व तिचे मुल जन्माला येवु नये असा त्याने प्रयत्न केला व त्यासाठी तिने त्यांचे विरूध्द छापिल पहिली खबर दाखल केली असा तोंडी पुरावा दिला आहे. परंतु, त्याचे समर्थनार्थ तिने कोणताही डॉक्टरांचा तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दिलेला नाही.

१८. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०३.०२.२०२२ रोजी दाखल केला आहे, गैरअर्जदार क्र. १ याने व ईतरांनी दिनांक २२.०९.२०२२ रोजी त्यांचे लेखी बयाण नि.क्र. २२ दिले आहे. गैरअर्जदार क्र. १ याचे तोंडी पुराव्यावरून त्याने अर्जदारावर कौटुबिक हिंसाचार केला नाही, तिला नांदण्याची नोटीस पाठवुन देखील ती नांदण्यासाठी आली नाही असा पुरावा देण्याचा प्रयत्न केला आहे, त्याने दाखल केलेले हिंदु विवाह याचिका क्र. १५१/२०२२ मधील न्यायनिर्णय नि.क्र. ५८ व हुकुमनामा नि.क्र. ५९ दिनांक १२.०९.२०२५ चे अवलोकन केले असता त्याने अर्जदाराविरूध्द दिनांक १९.०६.२०२२ रोजी कलम ९ प्रमाणे अर्ज दिला व दिनांक २२.०९.२०२२ रोजी त्याचे लेखी बयाण नि.क्र. २२ दाखल केले आहे. परंतु, त्यापुर्वी अर्जदाराने दिनांक ०३.०२.२०२२ रोजी त्याचे विरूध्द कौटुंबिक हिंसाचाराचा प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असल्याचे सिध्द होते. त्याच बरोबर गैरअर्जदाराने त्याचे लेखी बयाणामध्ये तो अर्जदाराला पोटगी देवु शकत नाही असे कथन केले आहे. परंतु, अर्जदाराचे व त्याचे पती पत्नीचे नाते आज देखील कायम असतांना त्याने तिला अर्जदाखल करण्याचे पुर्वीपासुन ते आज पावेतो खर्चासाठी खावटी देतो असा तोंडी अथवा लेखी पुरावा अभीलेखावर दिलेला नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्यानंतर त्याने अर्जदाराविरूध्द हिंदु विवाह याचिका क्र. १५१/२०२२ विचारविर्मशाने दाखल केल्याचे स्पष्टपणे दिसते.

१९. गैरअर्जदारातर्फे विद्वान विधीज्ञ टी. डी. कापगते यांनी **<u>जयेश उत्तमराव खैरनार व अन्य विरूध्द महाराष्ट्र सरकार व ईतर २०१० ऑल एम आर क्रिमीनल पान क्र. २२५९</u>** वरील न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे, मी सदर न्यायनिर्णयाचे अवलोकन केले आहे त्यानुसार त्यामधील अर्जदाराने मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे रिट याचिका दाखल केली होती. प्रकरणाचे वस्तुस्थितीनुसार त्यामधील अर्जदार व गैरअर्जदाराचे विवाहाचे दिनांक ०३.११.२००७ रोजी विच्छेदन झाले होते त्यानंतर त्याचे पत्नीने त्या विरूध्द अपिल दाखल केले नाही व तिने अर्जदाराविरूध्द तदनंतर कौटुंबिक हिंसाचाराविरूध्दचा अर्ज व ईतर फौजदारी कार्यवाही केली. त्यामुळे मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी अर्जदार व त्याचे

पत्नीमधील कौटुंबिक नातेसंबंध अस्त्तीत्वात नसल्यामुळे उपरोक्त नमुद कौटुंबिक हिंसाचाराचा अर्ज अमान्य केला. प्रस्तुतचे अर्जामधील परीस्थीतीनुसार अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचे पती पत्नीचे नाते आज देखील कायम असुन त्यांचे विवाहाचे आजतागायत विच्छेदन झालेले नाही. सबब, उपरोक्त नमुद न्यायनिर्णयामधील परीस्थीती प्रस्तुतचे अर्जाशी मिळतीजुळती नसल्याने प्रस्तुतचा न्यायनिर्णय हा प्रस्तुतचे अर्जाचे परीस्थीतीशी जुळत नसल्यामुळे तो येथे लागु होणार नाही असे नम्रपणे निवेदन करतो.

२०. एकंदर अर्जदार व गैरअर्जदाराचे तोंडी पुराव्यानुसार अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचे पती पत्नीचे नाते आजपर्यंत कायम असतांना देखील गैरअर्जदार क्र. १ याने तिची खावटीची व्यवस्था केली नाही, तिची आर्थिक अडवणुक केली आहे असे सिध्द होते व आर्थिक अडवणुकीचा कौटुबिक हिंसाचारामध्ये समावेश होतो. सबब, मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u>**

२१. अर्जदार गायत्री नानेश्वर गहाणे हिचे शपथपत्र नि.क्र. २५ वरील तोंडी पुराव्या प्रमाणे ती प्रस्तुतचे अर्जाचे पुर्वीपासुन नाईलाजाने तिचे माहेरी राहत आहे, गैरअर्जदार क्र. १ हा कास्तकार असुन त्याच्याकडे दहा एकर शेती आहे, त्याचेमधुन तो दोन हंगामात ऊस व धानासारखी पिके घेतो व खर्च वजनाकाठी त्याला प्रतिमहा १,००,०००/- मिळतात. त्यामुळे तो अर्जदाराला प्रतिमहा १०,०००/- रूपये खावटीपोटी देवु शकतो, प्रतिमहा निवासासाठी १,०००/- व आर्थिक आणि वैद्यकीय नुकसान भरपाई पोटी ५,५०,०००/- रूपये देवु शकतो. अर्जदाराने अर्जाचे समर्थनार्थ नि.क्र. ४६, ४७ आणि ४८ वर गैरअर्जदारांचे ७/१२ उतारे दाखल केले आहेत. त्याचे अवलोकन केले असता गैरअर्जदार क्र. २ चे नावावर गट क्र. २५ मौजा खोबा येथे १.६८ हे.आर जमिनीपैकी त्याचा भाऊ वसंता गहाणे व बहिण सिंधुबाई पर्वती यांचेसह सामाईक हक्काने असल्याचे दिसते.

२२. गैरअर्जदार क्र. १ याचे तोंडी पुरावा नि.क्र. ५३ प्रमाणे त्याचे कडे

उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही, तो अपंग असल्याने कोणतेही काम करू शकत नाही, त्यामुळे तो अर्जदाराला कसल्याही प्रकारची पोटगी देवु शकत नाही. अर्जदार महिन्याकाठी १५,०००/- रूपये कमवते व ती सधन असल्यामुळे तिला पोटगी देण्याची गरज नाही हे सिध्द करण्यासाठी गैरअर्जदारांनी पुरावा दिलेला नाही. गैरअर्जदार क्र. १ याने नि.क्र. ५४ वर तो शारीरीक दृष्टया असक्षम असल्याचे छायांकित वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केले आहे. परंतु, सदरचे प्रमाणपत्राला ओळखीसाठी निशाणी दिली असली तरी ते कायदयाचे विहित प्रक्रीयेप्रमाणे सिध्द झालेले नाही. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदारातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्याची वडीलोपार्जीत शेती असुन खोबा कोपना येथील गट क्र. २५ व १२६ मध्ये त्याचे वडीलांचा हिस्सा असुन गट क्र. ५१ ची ४० आर शेती त्याने विकली आहे व त्याचे वडीलांचे नावावरील शेती मध्ये तो ऊस व धानाची पिके घेतो असे त्याने मान्य केले आहे. परंतु, त्याने खर्च वजा जाता त्याचे वडीलांना दरमहा १ लाख रूपयांचे उत्पन्न मिळते हे अमान्य केले आहे. गैरअर्जदार क्र. १ याचे म्हणण्याप्रमाणे तो शारीरीक दृष्टया असक्षम असल्यामुळे अर्जदाराला पोटगी देवु शकत नाही. गैरअर्जदार क्र. १ याला वडीलोपार्जीत शेती आहे व तिचेमधुन ऊस व धानाची पिके येतात. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदाराचा पती असल्याने तिचे पालन पोषन करण्याची त्याची नैतिक व कायदेशिर जबाबदारी आहे. अर्ज दाखल तारखेच्या पुर्वीपासुन अर्जदार ही कौटुंबिक छळामुळे अथवा ईतर कारणामुळे तिचे माहेरी राहत आहे. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचे मधील वैवाहिक नाते अद्यापपावेतो अस्तीत्वात आहे व ते संपुष्टात आलेले नाही. गैरअर्जदार क्र. १ याने प्रस्तुतचा अर्ज दाखल झाल्यानंतर अर्जदाराविरूध्द नांदायला येण्यासाठी हिंदु विवाह अर्ज क्र. १५१/२०२२ दाखल केली असला तरी तो त्याने अर्जदाराला पोटगी दयायला लागु नये म्हणुन विचारांअती दाखल केल्याचे स्पष्टपणे दिसुन येते.

२३. गैरअर्जदार क्र. १ याला वडीलोपार्जीत शेती असुन त्यामध्ये मध्ये ऊस व धानाची पिके घेतली जातात असे त्याने मान्य केल्यामुळे त्याचे कुटुंबाला त्याचेपासुन किमान एक ते दीड लाखाचे वार्षिक उत्पन्न मिळत असावे असे स्पष्टपणे सिध्द होते.

त्याच बरोबर गैरअर्जदार क्र. १ हा शारीरीक दृष्टया असक्षम असला तरी त्याचे राहणीमानानुसार त्याचे सधन कुटुंबातील व्यक्तीला साजेसे राहणीमान आहे, तो मोटारसायकल चालवितो व त्यासाठी त्याला दररोज किमान १००/– रूपये खर्च लागत असावा असे स्पष्टपणे दिसुन येते. त्यामुळे तो अपंग असला तरी शारीरीक कष्टाव्यतिरीक्त बौधिक व हाताने करता येणारी कामे करून उत्पन्न मिळवु शकतो. दररोज चे मजुरीचे किमान ३००/– रूपये दर विचारात घेता तो महिन्याकाठी शेतीचे उत्पन्नाव्यतिरीक्त सात–आठ हजार कमवु शकतो. सबब, तो अर्जदाराला कलम १९ व २० प्रमाणे निवास व खावटीचे खर्चासाठी दरमहा ४,०००/– रूपये देवु शकतो.

२४. अर्जदाराने प्रस्तुतचे अर्जामध्ये गैरअर्जदार क्र. १ याचे पासुन कलम २० प्रमाणे ५,५०,०००/– नुकसान भरपाई व वैद्यकीय खर्चासाठी मागणी केली आहे. अर्ज कथनाप्रमाणे अर्जदाराने तोंडी पुरावा दिला असला तरी अर्जदाराने तिला लागलेल्या वैद्यकीय खर्चाची बिले दाखल केली नाहीत व त्याबाबतीतचा वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर ईत्यांदीचा पुरावा दिलेला नाही. त्याच बरोबर गैरअर्जदारांचे उत्पन्न पाहता सदरची मागणी मंजुर केल्यास तो त्याची पुर्तता करणे शक्य होणार नाही. सबब, अर्जदाराने नुकसान भरपाईची केलेली मागणी मंजुर करणे न्यायोचीत ठरणार नाही. सबब, अर्जदाराला मागणी प्रमाणे संरक्षण आदेश व कलम १९ व २० नुसार एकत्रीतरीत्या दरमहा ४,०००/– खावटी अर्ज दाखल तारीख ०३.०२.२०२२ पासुन मंजुर करणे न्यायोचीत राहिल. त्यामुळे मी मुद्दा क्र. २ चे उत्तर अंशत: होकारार्थी देतो.

<u>मुद्दा क्र. ३ करीता</u> :–

२५. माझे मुद्दा क्र.१ व २ चे उत्तरांमुळे अर्जदाराचा अर्ज अंशत: मंजूर करणे न्यायोचित होईल. गैरअर्जदार याने अर्जदाराच्या पालनपोषणाची कसलीही व्यवस्था केली नाही असे अभिलेखावरुन दिसून येते. त्यामुळे सद्य परिस्थितीचा विचार करता प्रस्तुतच्या आदेशापासुन निवास व खावटीची मागणी व संरक्षण आदेश मंजूर करणे न्यायोचित राहिल. सबब, मुददा क्र.३ चे उत्तरार्थ मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१) प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) गैरअर्जदार क्र. १ याने याने अर्जदार हिला दरमहा रक्कम रूपये ४,०००/–( चार हजार रूपये फक्त) निवास व खावटी च्या खर्चापोटी अर्ज दाखल तारीख ०३.०२.२०२२ पासुन द्यावी.

३) संरक्षण अधिकारी कुरखेडा, जि. गडचिरोली तसेच पोलीस ठाणे अधिकारी कुरखेडा यांना आदेशीत करण्यात येते की, गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार हिचे वर कोणत्याही प्रकारे हिंसाचार करु नये याकरीता अर्जदाराला योग्य ते संरक्षण पुरवावे. त्याचप्रमाणे गैरअर्जदार क्र. १ याने आदेशाचे उल्लघंन केल्यास त्याचे विरुध्द कार्यवाही करावी.

४) गैरअर्जदार क्र. १ याने अर्जाचा खर्च रूपये २,०००/–हा अर्जदाराला द्यावा.

५) अर्जदाराच्या उर्वरीत मागण्या अमान्य करण्यात येतात.

६) अर्जदाराला प्रस्तुत आदेशाची प्रत निशुल्क देण्यात यावी.

Digitally signed by NAGESH PRABHAKAR DESHPANDE
Date: 2026.04.21 17:26:05 +0530

दि. २१.०४.२०२६

(एन. पी. देशपांडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
कुरखेडा